



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com


**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**




● वर्ष : ०१ ● अंक : २५३ ● सोमवार, दि. ०१ जुलै २०२४ ● टी.सी.नं. - एमएएचएमआर५२३२५ ● एसडीएम नं. - एसडीएम/एसआर.६०/२०२३ ● पुणे ● मराठी दैनिक (रविवार सोडून) ● पाने ४ ● किंमत : २ रूपये

● Volum : 1 ● Issue : 253 ● Monday, 1 July 2024 ● Title Code. - MAHMAR52325 ● SDM No. SDM/SR/60/2023 ● Pune ● Marathi Dainik (Monday To Saturday) ● Page : 4 ● Price : 2 Rs/-





खडकवासल्यावर शिवसेनेचा दावा 3





बारामतीतला विजय हा जनतेचा विजय : सुळे 4


# वैष्णवांचा मेळा पुण्यनगरीत दाखल

## पालखी सोहळ्याच्या दर्शनासाठी लोटला जनसागर

- रस्त्यांवर भरला वारकऱ्यांचा मेळा
- सुट्टीचा दिवस सार्थकी लागला
- राजकीय पक्षही भक्तिरसात न्हाऊन निघाले

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कपाळी अष्टगंध, डोक्यावर फेटा, खांद्यावर भागवत धर्माची पताका घेऊन 'ज्ञानोबा- तुकोबां'च्या नामघोष करत पंढरीला निघालेला वैष्णवांचा मेळा रविवारी पुण्यनगरीत दाखल झाला.

या संतसोहळ्याची दिवसभर आतुरतेने वाट पाहणाऱ्या लाखो पुणेकरांचा माथा संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या पालखी रथावर टेकत असतानाच या भावभक्तीच्या सोहळ्याला खुद्द पावसानेही हजेरी लावली. रस्त्यांच्या दुतर्फा थांबलेल्या लाखो भाविकांनी पालखी सोहळ्यावर पुष्पवृष्टी करत टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले.

पालखीचे दर्शन घेत आपला नमस्कार पंढरीच्या विठ्ठलास पाठविला. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हजारो किलोमीटरचा प्रवास करून आलेल्या वारकऱ्यांचा यथोचित पाहुणचार करण्यास पुणेकर विसरले नाहीत.

राज्यातील बहुतांश भागात पावसाने हजेरी लावल्याने पेरण्या उरकून लाखो वारकऱ्यांची पावले पंढरीच्या वारीसाठी देहू-आळंदीकडे वळली. संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याने देहू-आळंदीतून प्रस्थान ठेवले. विठ्ठलाच्या भेटीची आस घेऊन निघालेले वारकरी व दोन्ही पालख्यांनी रविवारी दुपारच्या सुमारास पुण्याच्या वेशीत प्रवेश केला.

आळंदी रस्त्यावरील कळस येथे दुपारी सव्वादोन वाजण्याच्या सुमारास महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन त्यांचे स्वागत केले. या वेळी अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज पी. बी., अतिक्रमण विभागाचे उपायुक्त माधव जगताप, किशोरी शिंदे, प्रभारी नगर सचिव योगिता भोसले आदी उपस्थित होते.

दरम्यान, संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळादेखील दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास बोपोडी येथे दाखल झाला. या वेळी अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज पी. बी. यांनी पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन त्यांचे स्वागत केले.

रविवारी सकाळपासूनच शहरातील बहुतांश रस्त्यांवर वारकऱ्यांचे समूह दिसत होते. विशेषतः दुपारनंतर व पालख्यांचे आगमन झाल्यानंतर मुख्य रस्त्यांवर अक्षरशः वारकऱ्यांची लाट उसळली. टाळ-मृदंगाच्या गजरात, राम-कृष्ण-हरीचा जयघोष करीत वारकरी शांतपणे पालखी मार्गावरून चालत होते. तर डोईवर तुळशी वृंदावन घेतलेल्या महिलांचे समूहदेखील आपापल्या दिंड्यांसमवेत मार्गक्रमण करत होते.

विठ्ठलाच्या नामसंकीर्तनात तल्लीन होऊन निघालेल्या वारकऱ्यांच्या पायावरही भाविक डोके ठेवून आशीर्वाद घेत होते. दिंड्यांसमवेतच्या प्रमुख संतांचे पालखी रथ, पालखीमधील पादुका, नगारा, मानाचे अश्व, रथाच्या बैलजोडीचेही दर्शन घेण्यासही भाविक विसरले नाहीत. दिंड्यांसमवेत आयटी दिंडी, पर्यावरणपूरक दिंडी, ज्येष्ठ नागरिकांची दिंडी अशा विविध प्रकारच्या दिंड्यांनीही सहभाग घेतला होता. तर शहरातील काही नागरिकांचे समूहदेखील दिंड्यांसमवेत पायी जात होते.

रविवारी सुट्टीचा दिवस असल्याने पुणेकरांना पालखीचे दर्शन घेणे सोईस्कर ठरले. रविवारी दुपारपासूनच आळंदी रस्ता, बोपोडी येथील जुना मुंबई-पुणे महामार्ग, शिवाजीनगर, फर्ग्युसन महाविद्यालय रस्ता, लक्ष्मी रस्ता, नाना पेठ व भवानी पेठ या ठिकाणी भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. रस्त्यांच्या दुतर्फा भाविक आपल्या कुटुंबासमवेत पालखीचे दर्शन घेण्यासाठी उपस्थित होते. लहान मुलांची वारकरी, विठ्ठल, रुक्मिणीची वेशभूषा करण्यात आली होती.

अनेक तरुण-तरुणींनी पारंपरिक वेशभूषा करून पालखीच्या दर्शनासाठी हजेरी लावली होती. पालखीतील दिंड्यांमध्ये सहभागी झालेले वारकरी, अश्व, पालखी रथाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची अक्षरशः रीघ लागली होती. पालखीच्या स्वागतासाठी ठिकठिकाणी रांगोळ्यांच्या पायघड्या अंथरण्यात आल्या होत्या. अनेक संस्था, संघटना, कंपन्या, राजकीय पक्ष यांच्याकडून वारकऱ्यांना ठिकठिकाणी चहा, पाणी, बिस्किटे, फराळाचे जिन्नस, छत्र्या, रेनकोट, वस्तु ठेवण्यासाठी पिशव्या अशा वस्तुंचे वाटप करण्यात आले.

विविध राजकीय पक्षांकडून पालखी सोहळ्याचे विविध ठिकाणी स्वागत करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांनी दापोडी व विश्रांतवाडी येथे दोन्ही पालख्यांचे स्वागत केले.






भाजपच्यावतीने फर्ग्युसन महाविद्यालय रस्त्यावरील संत ज्ञानेश्वर महाराज पादुका चौक, संत तुकाराम महाराज पादुका चौक येथे पालख्यांचे स्वागत करण्यात आले. केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात आरती करण्यात आली. तर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते तुकाराम पादुका चौक येथे पालखीचे स्वागत करण्यात आले. या वेळी शहराध्यक्ष धीरज घाटे, आमदार सिद्धार्थ शिरोळे, राजेश पांडे आदी उपस्थित होते.

### पालिका आयुक्तांनीही केले पालखीचे सारथ्य

कळस येथे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे स्वागत महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी केले. त्यावेळी डॉ. भोसले यांनी पालखी रथाचे सारथ्य केले. महापालिका आयुक्तांकडून पहिल्यांदाच पालखी रथाचे सारथ्य करण्यात आल्याचा दावा महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी केला. त्याचबरोबर अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज पी. बी. यांनी बोपोडी येथे संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे स्वागत केले. त्यावेळी पृथ्वीराज यांनीही पालखी रथाचे सारथ्य केले.

# भिडेंना झालंय तरी काय?

## म्हणे वट सावित्रीच्या पूजेला नट्यांनी आणि ड्रेस घातलेल्या बायकांनी जाऊ नये



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज या दोन्ही पालखींचे आगमन पुणे शहरात काही वेळात होत आहे. या पालखी सोहळ्यात दरवर्षी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान संघटनेचे संस्थापक संभाजी भिडे गुरूजी हे असंख्य धारकऱ्यांसोबत संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात सहभागी होतात. त्यावरून अनेक वेळा वारकरी आणि धारकरी यांच्यात वादाचे प्रकार देखील घडले आहेत. या वर्षी देखील संभाजी भिडे हे पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी आले आहे. त्यापूर्वी संभाजी भिडे हे शिवाजीनगर भागातील जंगली महाराज येथे आले असून असंख्य धारकरी आहेत.

तुकाराम महाराज पालखी दर्शनाच्या वेळी कायदा सुव्यवस्था बिघडणार नाही. त्याबाबत काळजी घ्या, तसेच तेढ निर्माण करणारी भाषणे करू नका, अशा स्वरूपाची नोटीस पुणे पोलिसांनी संभाजी भिडे यांना बजवली आहे. असे असतानाही संभाजी भिडे यांनी वादग्रस्त वक्तव्य केल्याचे समोर आले आहे. उपस्थित धारकऱ्यांना मार्गदर्शन करतेवेळी भिडे म्हणाले की, आपल्याला 15 ऑगस्ट रोजी जे स्वातंत्र्य मिळाले ते दळभद्र आणि हांडग स्वातंत्र्य आहे. आपल्याला ते जमत नसून स्वतंत्र हिंदवी स्वातंत्र्य पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. तसेच, वट सावित्रीच्या पुजेला नट्यांनी जाऊ नये आणि ड्रेस मटेरियल घातलेल्या बायकांनीदेखील जाऊ नये, असे वादग्रस्त विधानदेखील भिडे यांनी केल्याने नव्या वादाला सुरुवात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

ज्यांनी हिंदवी स्वराज्याची शपथ घेतली. अशा 10 – 10 हजारांच्या तुकड्या दररोज रायगडावर जाणार आहेत. प्रत्येक तालुक्यात आपल्याला 10 हजारांची तुकडी करायची आहे. संपूर्ण देशात हिंदवी स्वराज्याचं व्रत घेतलेली लोकं आपल्याला तयार करायची आहेत. आपल्या जे स्वातंत्र्य मिळाला ते हांडगं स्वातंत्र्य आणि दळभद्री स्वातंत्र्य आहे. हिंदवी स्वराज्य हे खर स्वातंत्र्य आहे, असंही संभाजी भिडे म्हणाले आहेत.

संभाजी भिडे यांनी पुण्यातील जेएम रोडवरील जंगली महाराज मंदिरात जात दर्शन घेतलं. पालखी पुण्यात दाखल झाल्यानंतर भीडे गुरूजी थोड्याच वेळात शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या धारकरी आणि वारकऱ्यांसोबत वारीत सहभागी होणार आहेत. वारीत सहभागी होण्याआधी भिडे गुरूजी यांनी दरवर्षी प्रमाणे यंदाही जंगली महाराज मंदिरात दर्शन घेतलं. संभाजी भिडे यांच्यासोबत वारीत सहभागी होण्यासाठी महाराष्ट्रभरातून शिवप्रतिष्ठानचे धारकरी जंगली महाराज मंदिरात दाखल झाले आहेत. यावेळी संभाजी भिडे यांनी धारकऱ्यांना संबोधित केलं. तेव्हा वटपौर्णिमेबाबत त्यांनी हे विधान केलं आहे.

### भिडे आणि वाद जुने समीकरण : गंगणे

देशात लोकशाही आहे. कोणी काय करावे हा ज्याचा त्याचा अधिकार आहे. महिलांबाबत सूड भावनेने आणि आकसापोटी चित्र-विचित्र मते मांडणे हा भिडे यांचा तसा जुनाच धंदा आहे. महिला पत्रकाराला टिकली लावून ये आणि मग प्रश्न विचार असे म्हणणे असो किंवा दळभद्री स्वातंत्र्य यावर मांडलेले मत असो हे कायमच वादग्रस्त ठरलेले आहे. त्यांचे आंब्यावरचे मत तर फारच हास्यास्पद होते. देशात पुरूषांना स्वातंत्र्य आहे तसंच महिलांना देखील आहे. त्यामुळे बुद्धीजीवी भिडे यांनी आतातरी सुधारावं असं मनापासून वाटतं.

- प्रतिक गंगणे, व्यवस्थापकीय संपादक, दै. आरंभ पर्व




# इस शहर को ये हुआ क्या हैं ? – द पुणे ड्रग्स स्टोरी



“या घटनांमुळे पुण्यातील वाढत्या "नाइट लाईफ" संस्कृती व त्याचे समाजावर होणारे नकारात्मक परिणाम याबद्दल चिंता व्यक्त होत आहे. आणि या concept मुळे पुण्याचा आता उडता पंजाब होतोय का असा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे.”

पुणे हे शहर शिक्षण आणि संस्कृतीसाठी प्रसिद्ध आहे. "ऑक्सफर्ड ऑफ ईस्ट" म्हणून ओळखले जाणारे पुणे अनेक वर्षांपासून विद्यार्थ्यांसाठी आकर्षणाचे केंद्र राहिले आहे. परंतु महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असणाऱ्या पुण्याला ‘Night life’ concept ची वाळवी लागली आहे. महाराष्ट्रामध्ये मुंबईपाठोपाठ पुण्यामध्ये सर्वात जास्त अंमली पदार्थांची तस्करी केली जात असल्याचे वास्तव समोर आले आहे. पुण्यातील एफसी रोडवरील नामांकीत हॉटेलमध्ये तरुणांचा ड्रग्जची नशा करतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला अन् एकच खळबळ उडाली. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्यात अल्पवयीन मुलेसुद्धा ड्रग्सचे सेवन करत असल्याचे प्रकरण समोर आले आहे.

पुन्हा एकदा पुण्यातील मध्यरात्री सुरू असलेल्या पब्ज आणि बारचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. यापूर्वी पुण्यातील कल्याणी नगर परिसारात एका अल्पवयीन मुलाने दोन जणांना उडवलं होतं. दोघांचा यात मृत्यू झाला होता. त्यानंतर अनेक कारवाई करण्यात आल्या मात्र तरी देखील ड्रग्ज पार्टी होत आहेत. नाइट लाईफ या संस्कृतीचा पहिल्यांदा उल्लेख त्यावेळेसच्या शिवसेनेच्या युवा नेत्याने म्हणजेच आदित्य ठाकरे यांनी 2013 साली केला होता. पाश्चात्य संस्कृती कडून प्रेरणा घेऊन ती संस्कृती भारतात महत्वाचे म्हणजे महाराष्ट्र मध्ये आणणे हे आदित्य ठाकरे याचे खूप आधी पासूनचे स्वप्न होत. जसे बाहेरील देशात 5 ते 6 वाजे पर्यंत पब, हॉटेल , सिनेमा घर चालू असतात, तसेच काहीसे मुंबई आणि पुण्यामध्ये करण्याचे आदित्य यांचे उद्धिष्ट होते.

2013 मध्ये मांडलेल्या या प्रस्तावाला 2020 मध्ये ज्या वेळेस महाविकास आघाडी च्या कॅबिनेट ने मंजूरी दिली, तेव्हा आदित्य ठाकरे महाराष्ट्राचे पर्यटन मंत्री होते. आदित्य ठाकरे यांच्या त्या वेळेस च्या वक्तव्यानुसार, “कायद्यात सुधारणा झाल्यानंतर रेस्टॉरंट आणि बारसाठी 1.30 AM ची अंतिम मुदत रद्द केली जाण्याची शक्यता होती .” या सगळ्या नंतरच नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो (NCB) चे Former Zonal Director समीर वानखेडे यांनी कॉर्डेलिया क्रूझ वर कोट्यवधी रुपयांचे ड्रगचे रॅकेट उघडकीस आणून शाहरुख खान यांच्या पुत्राला आर्यन खान ला अटक केली होती. याच 2020 ते 21 दरम्यान महाराष्ट्र पोलीस आणि NCB यांनी मिळून जवळ जवळ 200 ते 300 कोटी रुपयांचे ड्रग्स महाराष्ट्र मधून जप्त केले. या वरूनच समजून येते कि आदित्य ठाकरे यांना नाइट लाईफ ची concepct मुंबई मध्ये राबवायची होती. मुंबईपाठोपाठ पुणेही आता ‘कॉस्मोपॉलिटन’ झाले आहे. मुंबई सारखेच या नाइट लाईफ च्या वाळवी ने पुण्या मध्ये सक्रिय होऊन, पुण्याच्या संस्कृतीला पोखरण्यास सुरवात केली. शहराचे स्वास्थ्य जसे दिवसेंदिवस बिघडत चालले आहे तसेच व्यसनाधिनतेचे प्रमाणही वाढत चालले आहे. अंमली पदार्थांच्या तस्करीमध्ये झपाट्याने होत चाललेली वाढ चिंताजनक असून पुणे शहर नवे ‘ड्रग हब’ ठरत आहे. दिवसेंदिवस घट्ट होत चाललेल्या व्यसनांच्या या विळख्यामध्ये तरुणाई अडकत आहे. विशेषत: शहरातील विविध भागात छुप्या आणि उघड पद्धतीने नशेचे साहित्य राजरोसपणे विकले जात असून पोलिसांच्या सातत्याने सुरु असलेल्या कारवायांनाही हे गुन्हेगार जुमानेनासे झाले आहेत. पुण्यामध्ये दिवसागणिक वाढत चाललेली ही तस्करी मोडीत काढण्याचे आव्हान पोलीस यंत्रणांसमोर आहे. 2021 मध्ये, पुण्यामध्ये 154 आरोपींसह 107 प्रकरणे नोंदवण्यात आली, परिणामी फक्त 2.5 कोटी रुपये जप्त करण्यात आले. परंतु जसे महाविकास आघाडीचे सरकार पडले, आणि शिंदे सरकार आले, तसे ड्रग्स विरोधी कारवायांमध्ये लक्षणीय वाढ झाली. 2022 मध्ये 150 प्रकरणे, 200 आरोपी आणि 9 कोटी रुपयांच्या जप्तीसह लक्षणीय वाढ झाली. मध्यप्रदेश, बिहार, उत्तर प्रदेश आणि गोव्यामधून राज्यभर हे विष ड्रग माफिया त्यांच्या 'नेटवर्क'मार्फत पसरवत आहेत. शहरातील काही नामवंत आणि उच्चभ्रु महाविद्यालयांमध्ये शिकायला आलेल्या धनाढ्यांच्या मुलांना 'ड्रग डिलर्स' हेरतात. महाविद्यालयांमध्ये या डिलर्सनी स्वत:चे वेगळे नेटवर्क उभे केलेले आहे. त्यांच्या नेटवर्कमधून या धनाढ्य विद्यार्थ्यांपर्यंत ह्या नशेच्या वस्तू पोचवल्या जात आहेत. शिक्षणाच्या निमित्ताने बाहेरगावी असलेल्या तरुणांकडे त्यांच्या पालकांचे लक्ष नसते. आपली मुले कुठे जातात, काय करतात याकडे पहायला पालकांना वेळ नाही. त्यामुळे असे सावज हे डीलर्स शोधत असतात. अंमली पदार्थांच्या सेवनामध्ये सर्वाधिक प्रमाण हे महाविद्यालयीन तरुणांचेच आहे. मध्यंतरी एक व्हिडीओ viral झाला होता, त्या मध्ये ड्रग्स च्या आहारी गेल्याला दोन मुली बेशुद्ध अवस्थेत पुण्यती वेताळ टेकडी वरती सापडल्या होत्या. ग्राहकांकडे कोकेन, ब्राऊन शुगर, अफू, चरस यांसारखे नशेचे साहित्य पोचवले जाते. त्यामध्ये आता एमडी अर्थात मेफेड्रोनची भर पडली आहे. मागील तीन वर्षात पुण्यात सर्वाधिक विक्री एमडीची होत असल्याचे समोर आले आहे. चालू वर्षात 6 कोटी 91 लाखांचे एमडी जप्त करण्यात आले आहे. विविध पार्टी, गेट टुगेदर अशा गोंडस नावाखाली रेव्ह पार्ट्या, हुक्का आणि मद्य पार्ट्या आयोजित केल्या जातात. सोशल नेटवर्किंग साईट्सवर आणि व्हॉट्सॲपवर सक्रिय असलेल्या तरुणाईपर्यंत ही व्यसनाची साधने पोचवणे त्यामुळे अधिक सोपे होत चालले आहे. Night life च्या concept मुळे परिस्थिती इतकी बिकट झाली आहे कि, आता तर रोलिंग पेपर पण ऑनलाईन मिळत आहेत. zepto , blink it सारख्या online mart मुळे सगळे साहित्य काही मिनिटांमध्ये तुम्हाला घरपोच मिळते. शहरातील ड्रग तस्करीवर पोलीस बारीक नजर ठेवून आहेत. त्यामुळेच यंदा चालू वर्षात कारवायांचा वेग वाढलेला आहे. या तस्करीमध्ये सहभागी असलेल्या गुन्हेगारांची सातत्याने झाडाझडती घेतली जात आहे. मागील दहा वर्षांतील सर्वाधिक उच्चांकी किमतीचे अंमली पदार्थ यावर्षी जप्त करण्यात आलेले आहेत. चालू वर्षात 6 कोटी 91 लाखांचे एमडी जप्त करण्यात आले आहे. 22 फेब्रुवारी ला पुणे शहर पोलिसांच्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या अंमली पदार्थाचा भंडाफोड करताना, गुन्हे शाखेने दौंड तालुक्यातील रसायन निर्मितीच्या कारखान्यावर, पुण्यातील विश्रांतवाडी येथील दोन गोदामे आणि साऊथ एक्स्टेंशन मधील काही दुकानांवर छापे टाकून सुमारे 3,000 कोटी रुपयांचे सुमारे 1,700 किलो मेफेड्रोन जप्त केले आहे होती.

## एचडीएफसी अर्गो तर्फे योजनेची अंमलबजावणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एचडीएफसी अर्गो जनरल इन्शुरन्स या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील सर्वसाधारण विमा कंपनीची नेमणूक महाराष्ट्र सरकार कडून प्रधान मंत्री फसल बिमा योजना (पीएमएफबीवाय) ची अंमलबजावणी करण्यासाठी एजन्सी म्हणून केली असून ही अंमलबजावणी कर्जदार आणि कर्ज न घेतलेल्या उस्मानाबाद, धुळे, पुणे, हिंगोली आणि अकोला जिल्ह्यातील 2024 साठी ही अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या योजनेची अंमलबजावणी खालील पिकांसाठी असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या पिकानुरूप व देण्यात आलेल्या तारखांनुसार करण्यात येणार आहे. पीएमएफबीवाय योजने अंतर्गत शेतकऱ्यांना विविध प्रकारच्या बाह्य धोक्यांपासून शेतकऱ्यांना विमा संरक्षण दिले जाते, यामध्ये दुष्काळ, पूर, पावसाने ओढ घेणे, दरड कोसळणे, चक्रीवादळ, वादळे, धुळीची वादळे, पूरपरिस्थिती, कीडीचा प्रादुर्भाव होणे, आजार आणि अन्य गोष्टींचा समावेश आहे. पिकाचे नुकसान समजून घेण्यासाठी राज्य सरकार कडून या योजनेअंतर्गत समावेश असलेल्या पिकांचे क्रॉप कटिंग एक्सपिरिमेंट्स (सीसीईज) चे नियोजन आणि आयोजन करण्यात येते. जर सीसीईज चे आयोजन केल्यानंतर उत्पादनाची आकडेवारी कमी आढळल्यास शेतकऱ्यांना उत्पादनातील फरक दिला जातो. या विमा योजने मध्ये पिकांच्या लागवडीसह अनेक टप्प्यांमध्ये काम केले जाते जसे पेरणी पूर्वी, पेरणी आणि कापणी नंतरच्या धोक्यांचा अभ्यास केला जातो. पीएमएफबीवाय योजने अंतर्गत असेलल्या उत्पादनांना महाराष्ट्र सरकारच्या कृषी विभागाने मान्यता दिली आहे.

## वाढदिवसानिमित्त 311 जणांचे रक्तदान

**नऱ्हे (दै. आरंभ पर्व)**
**लक्ष्मण साबळे**

नऱ्हे गावचे माजी उपसरपंच अक्षय सुभाष इंगळे यांच्या वाढदिवसा निमित्त जय गणेश मित्र मंडळ आयोजित रक्तदान शिबिरास प्रचंड प्रतिसाद मिळाला.

झील कॉलेज परिसरात आयोजित केलेल्या या शिबिरामध्ये युवकांनी मोठी गर्दी केली. 13 महिलांनीही रक्तदान केले. खडकवासला राष्ट्रवादी विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष काकासाहेब चव्हाण माजी सरपंच सागरभाऊ भुमकर माजी सरपंच पोपटराव खेडेकर अनिलभाऊ कोंढारे माजी उपसरपंच सुशांत कुटे बापूसाहेब पोकळे सुमित बेनकर सुनील अण्णा वाल्हेकर संभाजी काकडे सतीश कुटे यांनी रक्तदान शिबिरास भेट दिली. रक्तदान ही काळाची गरज आहे त्यासाठी सर्वांनी रक्तदान करावे.असे आवाहन मान्यवरांकडून करण्यात आले.

रक्तदान शिबिरासाठी कुणाल इंगळे,दिगंबर वळसे पाटील, कालिदास माताळे पाटील,निलेश लांडगे, किरण वळसणकर,मयूर पवार, शैलेश कांबळे यांनी परिश्रम घेतले.



### रक्तदान शिबिरे होणं गरजेचे



सध्या सर्वत्र रक्ताचा तुटवडा जाणवत आहे रक्तदानासारखे पवित्र दान नाही रक्त हे फक्त शरीरातच तयार होते त्यामुळे सर्वांनी रक्तदान करणे गरजेचे आहे. एका रक्तदात्यामुळे 3 जणांचा जीव वाचू शकतो. अशी शिबिरे होणे गरजेचे आहेत.

- अक्षय इंगळे, मा.उपसरपंच

## अध्यक्षपदी संदीप सोनवणे : पदनियुक्ती सोहळा संपन्न

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

पुणे जिल्हा प्रिंट व डिजिटल मीडिया पत्रकार संघाशी संलग्न असलेल्या दौंड तालुका प्रिंट व डिजिटल मीडिया पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी पुढारीचे राहु (ता. दौंड) येथील बातमीदार संदीप शिवाजी सोनवणे यांची निवड करण्यात आली. तर संघटनेच्या उपाध्यक्षपदी संदीप सिद्धार्थ भालेराव (पश्चिम विभाग) व विलास जयवंत कांबळे (पूर्व विभाग) या दोघांची निवड करण्यात आली आहे. तर 'पुणे प्राईम न्यूज'चे यवत येथील बातमीदार राहुलकुमार दत्तात्रय अवचट यांच्यावर सचिव पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. पुणे जिल्हा प्रिंट व डिजिटल मीडिया पत्रकार संघाचे अध्यक्ष राजेंद्र उर्फ बापूसाहेब काळभोर यांच्या अध्यक्षतेखाली चौफुला (ता. दौंड) येथील श्री क्षेत्र बोरमलनाथ मंदिरात गुरुवारी (ता. 27) दौंड तालुका प्रिंट व डिजिटल मीडिया पत्रकार संघाची बैठक पार पडली. या बैठकीत संघटनेचे राज्याचे अध्यक्ष सुनील जगताप व कार्याध्यक्ष जनार्दन दांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली बापूसाहेब काळभोर यांनी दौंड तालुका प्रिंट व डिजिटल मीडिया पत्रकार संघाची तालुका कार्यकारिणी जाहीर केली. यावेळी संघटनेचे राज्याचे सचिव संदीप बोडके, खजिनदार विजय काळभोर, जेष्ठ सल्लागार तुळशीराम घुसाळकर, प्रभाकर क्षीरसागर, जिल्हा समन्वयक तुकाराम गोडसे, हवेली तालुका उपाध्यक्ष चंद्रकांत दुंडे, उपाध्यक्ष अमोल अडागळे, समन्वयक अमोल भोसले, रियाज शेख, राजेंद्र हजगुडे, सुधीर कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित पत्रकारांना मार्गदर्शन करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष सुनील जगताप म्हणाले, 'एकच ध्यास पत्रकारांचा विकास' हे ब्रीदवाक्य घेऊन जिल्ह्यातील पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी आम्ही संघटनेच्या माध्यमातून काम सुरु केले आहे.




## #हातातलं गेलं तरी नशिबात असलेलं नक्की मिळतं

**(दै. आरंभ पर्व)**




भारतानं वर्ल्ड कप जिंकला आणि अनेक वर्षांचा icc ट्रॉफीचा दुष्काळ संपवला. मोक्याच्या क्षणी खच खाणारा संघ अगदी फिनिक्स पक्षाप्रमाणे भरारी मारली. ह्यां विजयाचं श्रेय सांघिक कामगिरीला द्यावं लागेल.

भले द्रविडचं टीचिंग असो असो वा रोहितची कॅप्टनसी मात्र संपूर्ण स्पर्धेतील प्रत्येक सदस्यांनी महत्त्वाच्या क्षणी विविध टप्प्यात केलेली चांगली कामगिरी यामुळे आपण विश्वविजेते झालो. अक्षरशः डोळ्यात पाणी आलं कारण 2023साली फायनल मध्ये 140 कोटी भारतीयांना जिवाला लागणारा पराभव आपल्याला ऑस्ट्रेलियाकडून स्वीकारावा लागला होता.

त्याचवेळी बीसीसीआयने द्रविडला करार वाढवायला लावला. व रोहित व कोहली त्यांना t20 साठी संघात ठेवण्याचा निर्णय घेऊन विश्वविजयाची मोहीम आखली गेली.

पात्रता फेरीतील विजयानंतर सुपर आठ मध्ये इतर संघा सोबत ऑस्ट्रेलियाचा पराभव करतं 2023 च्या पराभवाचे उट्टे काढले. रोहितने अक्षरशः कहर करतं स्टार्कची केलेली धुलाई कायम लक्षात राहिलं .

पुढे सेमी फायनल मध्ये इंग्लंडला 2022ची पराभवाची व्याजासह परतफेड केली. इथेच विश्वविजयाच्या मोहिमेचा पाया खंबीर रचला होता.कारण भारतीय संघाला इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया ह्या संघाकडूनच पराभवाचा झटका बसू शकत होता.

,महत्त्वाच्या सामन्यांमध्ये नाणेफेक जिंकून रोहितने फलंदाजी करणं दुधात साखर होती.कारण दुसऱ्या डावामध्ये खेळपट्टी बदलण्याची चान्सेस जास्त होते.

पूर्ण स्पर्धेमध्ये धावा वा न काढणाऱ्या विराटने विकेटवर तळ ठोकला अक्षर व दुबेने फटके फटकेबाजी वरून साउथ आफ्रिकेच्या गोलंदाजावर दडपण आणले.

177धावसंख्या खुप होती. दोन विकेटला lgope गेल्याने दक्षिण आफ्रिका अडचणीत सापडली.डिकॉकने स्टब ला साथीला घेतं स्पिनरवर हल्ला चढवला.नंतर क्लासेन अक्षरच्या एका ओव्हर मध्ये सामना खेचून नेला.

हृदयांत पुन्हां एकदा पराभवाचे धक्के जाणवू लागले . आफ्रिकेच्या विजयाची फक्त औपचारिकता बाकी राहिली होती.

रोहितने हार्दिकला बॉलिंग दिली आणि क्लासन आऊट झाला.जीवात जीव आला. पुढे चोकोर्स म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या आफ्रिकेच्या फलंदाजावर दडपण वाढत गेले आणि विकेट व डॉट बॉल जाऊ लागले.

एका साईडला मिलर उभा राहिला. शेवटच्या पहिल्या चेंडूवर षटकार खेचलाच होता परंतु नियतीने सूर्याच्या हातात विश्वकप स्वाधीन केला.धडधड वाजणारे डोळ्यांत पाणी आलेलं भारतीय प्रेक्षक आनंदाने उड्या मारु लागले.अन् 17 वर्षानंतर भारत विश्वविजेता झाला!!!

जे जे नशिबात असतं ते तुम्हाला मिळतच असतं फक्त त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करायला हवे हेच या विश्वविजयातून आपण शिकू शकतो.

बाकी या विश्वविजल्यानंतर आपण कर्णधार म्हणून रोहित शर्मा आक्रमक फलंदाज विराट कोहली व अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजा यांना आपण खूप मिस करणार आहोत खरंय पण कुठं तरी नवीन पिढीलाही आपलं कर्तुत्व दाखवायची संधी मिळावी हाच त्यांचा प्रयत्न असू शकतो.

बाकी निगेटिव्ह पासून पॉझिटिव्ह विचार करणारे सर्व प्रेक्षक रसिक इंग्लंड व ऑस्ट्रेलियाचा माज जिरवला यामुळे भलतेच खुश झालेत कारण ट्रॉफीसाठी काय करावं लागतं हे आपल्याला काल दिसलं.

सूर्याचा झेल कायमस्वरुपी डोळ्यांत साठवून हार्दिकचा भावनापूर्ण चेहरा रोहितने तिथल्या मातीला दिलेला मान विराटची खेळी अर्शदिप बुमराहचा मारा सारं आठवतं युवा पिढीला पाठिंबा द्यावा लागणार आहे.

खुप खुप शुभेच्छां सर्वांना.

लक्ष्मण साबळे,
मोबा. 8605284272

## थोडक्यात



### सिंहगड चौपाटी पथविक्रेता संघाच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी

**पुणे-लक्ष्मण साबळे (आरंभ पर्व) :** सिंहगड रोडवरील सिंहगड चौपाटी पथविक्रेता संघाच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले. समर्थ सेवा प्रतिष्ठानच्या वतीने येथे आरोग्य तपासणी व रक्त तपासणी एक्सरे या सुविधा उपलब्ध करून देण्यात आले. ह्यां मध्ये 110 नागरिकांनी आरोग्य शिबिरात सहभाग घेतला. ह्या आरोग्य शिबिरासाठी सिंहगड चौपाटी पथविक्रेता संघ व राजेश मरगळे सागर बाबर रोहित खुळे दुर्गा महातो बापूसाहेब आखाडे किरण मारणे आदिराज बोरुडे समीर भागवत मोहम्मद खान अभिजीत अवसरे परिश्रम घेतले. यावेळी टीव्हीसी मेंबर तसेच गजानन पवार शिवा पासलकर दीपक मोहिते सुनील भाऊ भादेकर ज्ञानेश्वर कोठावळे कमल जगधने शहनाज बागवा आदीजण उपस्थित होते.



### नऱ्हे गावातील ड्रेनेज समस्यांकडे काका चव्हाण यांनी लक्ष वेधले

**पुणे-लक्ष्मण साबळे (आरंभ पर्व) :** अनेक दिवसांपासून नऱ्हे गावात अनेक ठिकाणी ड्रेनेज तुंबण्याच्या वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ड्रेनेज तुंबल्यामुळे सांडपाणी रस्त्यावर वाहत आहे आणि याचा नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. याकडे खडकवासला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष काकासाहेब चव्हाण यांनीही याकडे लक्ष वेधले आहे. वेताळबुवा चौक परिसरातील काही ठिकाणाची पुणे महानगरपालिकेचे अभियंता देशमुख व नाईक यांच्यासोबत पाहणी केली व त्वरित उपाययोजना करावी अशी मागणी काकासाहेब चव्हाण यांनी केली आहे यावेळी माजी सभापती सौ.भूमकर व अधिकारी व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वारकऱ्यांची सेवा करणारे 'वारीवीर'

**पुणे-लक्ष्मण साबळे (आरंभ पर्व) :** "ज्ञानोबा-तुकोबाची पालखी खांद्यावर घेऊन टाळ-मृदूंगाच्या नादात, विठू नामाच्या गजरात पंढरीच्या दिशेने निघालेल्या लाखो वारकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य आपल्याला मिळत आहे. पायी वारीत चालून थकलेल्या, शिणलेल्या वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरविण्याचा हा उपक्रम स्तुत्य आहे. अथक परिश्रम घेऊन निःस्वार्थ मनोभावे वारकऱ्यांची सेवा करणारे आपण सर्वजण पंढरीचे 'वारीवीर' आहात," अशी भावना राज्याचे माजी मुख्य सचिव रत्नाकर गायकवाड यांनी केली. सिंबायोसिस विद्यापीठ रुग्णालय आणि संशोधन केंद्र, सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ आणि सौ. शीला राज साळवे मेमोरियल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज व संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज पालखी सोहळ्यानिमित्त वारकऱ्यांसाठी फिरता दवाखाना उपक्रमाचा शुभारंभ शनिवारी झाला.

# थोडक्यात



## अध्यक्षपदी सौरभ अमराळे

**पुणे (आरंभ पर्व) :** पुणे शहर युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदी सौरभ अमराळे यांची वर्णी लागली आहे. इंडीयन युथ काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रीनिवास बी.व्ही. यांनी महाराष्ट्र युथ काँग्रेसच्या काही पदांसह विविध जिल्ह्यातील नियुक्त्या जाहीर केल्या आहेत.त्यात पुणे शहर युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सौरभ अमराळे यांच्यावर सोपवली आहे. सौरभ अमराळे यांनी युवक काँग्रेसच्या माध्यमातून गेले 15 वर्षे कार्यकर्ता, उपाध्यक्ष ,वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणूनही भरीव कामगिरी केली आहे.तसेच ते विविध संघटनांचे पदाधिकारी असून सामाजिक कार्यातही सदैव अग्रेसर असतात.विशेषतः संघटनात्मक बांधणीमध्ये त्यांचा हातखंडा असल्याचे पाहून त्यांच्यावर आता पुणे शहर युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदाची धुरा सोपविण्यात आली आहे. या निवडीवर प्रतिक्रिया व्यक्त करताना सौरभ अमराळे म्हणाले की, काँग्रेस पक्षाच्या ध्येय धोरणानुसारच आजवर कार्य केले आहे. पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला प्राधान्य देवून युवक काँग्रेसच्या माध्यमातून पक्षाची विचारधारा तळागाळातील जनतेपर्यंत पोहचविताना युवा वर्गाचा जास्तीस जास्त सहभाग काँग्रेस पक्षात व्हावा यासाठी कार्यरत आहे.आता अध्यक्ष पदाची जबाबदारी पक्षाने सोपवली आहे.ती आ लेणखी कार्यक्षमतेने निश्चितच पार पाडणार अशी ग्वाहीही यावेळी त्यांनी दिली.



## नोबल हॉस्पिटल अँन्ड रिसर्च सेंटर येथे ह्युमन मिल्क बँकचे उद्घाटन

**पुणे (आरंभ पर्व) :** नोबल हॉस्पिटल अँन्ड रिसर्च सेंटर ने रोटरी क्लब ऑफ पुणे सिनर्जी यांच्या सहयोगाने ह्युमन मिल्क बँक सुरू केली आहे. याचे उद्घाटन प्रसिध्द अभिनेत्री व निर्माता श्वेता शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी रोटरी डिस्ट्रिक्ट 3131 च्या प्रांतपाल रोटेरियन मंजू फडके, गव्हर्नर इलेक्ट रोटेरियन शीतल शहा, रोटरी क्लब ऑफ पुणे सिनर्जीच्या अध्यक्ष सोनम ठाकूर,नोबल हॉस्पिटल अँन्ड रिसर्च सेंटरचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.दिलीप माने,संचालक डॉ.दिविज माने, कार्यकारी संचालक डॉ.एचके साळे,पेडियाट्रिक्स विभागाचे प्रमुख डॉ.पी. डी.पोटे,नवजात शिशु तज्ञ व एनआयसीयूमधील अँकेडेमिक्स विभागाचे प्रमुख डॉ.अनिल खामकर,ऑप्थॉल्मोलॉजी विभागाचे संचालक डॉ.मंगेश लिंगायत आणि निओनॅटोलॉजी विभागाचे संचालक डॉ.अभय महिंद्रे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. नोबल हॉस्पिटल अँन्ड रिसर्च सेंटर येथे ह्युमन मिल्क बँक सुरू करण्यामध्ये रोटेरियन डॉ.अर्चना शिंगवी आणि रोटेरियन नीरज पांचाळ यांनी महत्वाची भूमिका बजावली.



## अध्यक्षपदी काळुराम दौंडकर तर उपाध्यक्षपदी लक्ष्मण कानडे

**राजगुरूनगर (आरंभ पर्व) :** कन्हेरसर (ता.खेड) येथील विविध कार्यकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी माजी सैनिक काळुराम दौंडकर यांची बहुमताने तर उपाध्यक्षपदी जेष्ठ संचालक लक्ष्मण कानडे यांची बिनविरोध निवड करण्यात झाली. येथील खेड कृषी उत्पन्न बाजार समितीत निवडणुक प्रक्रिया पार पडली. दरम्यान अध्यक्षपदासाठी तीन अर्ज दाखल झाले. तर उपाध्यक्षपदासाठी 84 वयाचे जेष्ठ संचालक लक्ष्मण कानडे एकमेव अर्ज दाखल झाला होता. छाननी मध्ये चारही अर्ज वैघ ठरले. त्यापैकी एका उमेदवाराने माघार घेतल्याने एकास एक लढत झाली. त्यामध्ये काळुराम दौंडकर यांना नऊ तर पतिस्पर्धी उमेदवाराला चार मते मिळाल्याने निवडणुक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सुभद्रा बगाटे, सहाय्यक निवडणुक अधिकारी तथा सचिव दत्तात्रय रोडे यांनी काळुराम दौंडकर यांची बहुमतांनी तर लक्ष्मण कानडे यांची बिनविरोध निवड झाल्याचे घोषित केले.




# खडकवासल्यावर शिवसेनेचा दावा



**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

शिवसेना खडकवासला मतदार संघातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत सर्व पदाधिकाऱ्यांनी एकमुखाने खडकवासला मतदार संघावर दावा ठोकला आहे. बारामती लोकसभा मतदार संघाच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत खडकवासला मतदार संघात महायुतीला रोखण्यात शिवसेनेची प्रमुख भूमिका राहिली आहे. त्यामुळे मागील निवडणुकीत असलेली 65 हजाराची पीछेहाट हि 20 हजार पर्यंत कमी झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे 9 नगरसेवक, पीडीसीसी बँक आणि बाजार समिती संचालक व अनेक नेतेमंडळी अजित दादांबरोबर गेली असताना व भाजप चे स्थानिक आमदार, भाजप चे 18 नगरसेवक व मोठया संख्येने नेतेमंडळी समोर असताना देखील हि कामगिरी करण्यात शिवसेनेची साथ राष्ट्रवादी शरद पवार पक्षाला मिळाली म्हणून हे शक्य झाले अशा भावना कार्यकर्त्यांनी बोलून दाखवल्या. राष्ट्रवादी काँग्रेसला अंतर्गत कलहामुळे 2004 पासून या मतदार संघात यश मिळवता आलेले नाही. आता तर त्यांचे विभाजन झालेले आहे. त्यामुळे शिवसेनेच्या मदती शिवाय ते येथे निवडणूक जिंकू शकत नाहीत. बारामती मतदार संघातील किमान दोन जागा तरी शिवसेनेला मिळव्यात अशी जोरदार मागणी शिवसैनिकांनी पक्ष नेतृत्वाकडे केली आहे.

या बैठकीत शिवसेना शहरप्रमुख गजानन थरकुडे, विधानसभा प्रमुख नितीन वाघ, उपशहर प्रमुख भरत कुंभारकर, मा. जिल्हा परिषद सदस्य विलास मते, मा. सभापती बाळासाहेब मोकाशी, बुवा खाटपे, रवि मुजुमले, तानाजी पवळे, सचिन पासलकर, संदिप मते, संतोष गोपाळ,महेश मते,वैभव हनमघर, विजय कोल्हे, योगेश पवार, आदित्य बांडे हवलदार, निरंजन कुलकर्णी, पंढरीनाथ खोपडे, अरुण घोगरे, राजू चव्हाण, रामदास गायकवाड, पप्पू गायकवाड, भरत गोगावले, सौरभ मोकाशी, विलास चोर, गुरुदत्त हगवणे,नाना मरगळे,निवृती वाव्हळ,राहूल देशमुख, शिवम खोपडे, अरिफ तांबोळी, गोपीनाथ रानवडे हे उपस्थित होते.

## विनिता बेंडाळे यांनी चिकित्सा केलेला रिपोर्ट प्रकाशित

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील द्युम्ना वूमेन्स क्लिनिक मधील वैद्य विनिता बेंडाळे यांनी चिकित्सा केलेल्या रुग्णाचा केस रिपोर्ट जर्नल ऑफ रिप्रॉडक्शन अँड इन्फर्टिलिटी या आंतरराष्ट्रीय वैद्यकीय नियतकालिकाने प्रकाशित केला आहे. एक 44 वर्षांचा पुरुष रुग्ण द्युम्ना वूमेन्स क्लिनिक मध्ये स्पर्म डीएनए फ्रॅगमेनटेशन असा रिपोर्ट घेऊन आला. आयुर्वेदानुसार त्या रुग्णाची संपूर्ण इतिहास जाणून आयुर्वेद चिकित्सा करण्याचे ठरले. त्याच्यावर आयुर्वेदाच्या सिद्धांतानुसार शुक्र धातूंमधील विकृतीवर चिकित्सा करून रसायन औषधे



व बस्ती चिकित्सा दिली व रुग्णाला केवळ चार महिन्याच्या चिकित्सेने यश मिळाले. त्याचे एसडीएफ ची तपासणी चार महिन्यांच्या चिकित्सेनंतर पुन्हा केली असता रिपोर्ट स्पर्म मधील विखंडन प्रक्रिया दुरूस्त झाल्याचे आढळून आले.

## यू ग्रो कॅपिटलकडून 'एमएसएमई अच्छा है' मोहीमेचा शुभारंभ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक एमएसएमई दिनानिमित्त, यू ग्रो कॅपिटलने 'एमएसएमई अच्छा है' या अभिनव मोहिमेचे अतिशय उत्साहात आणि अभिमानाने अनावरण केले. या मोहिमेत भारताच्या अर्थव्यवस्थेत सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई ) देत असलेल्या अपरिहार्य योगदानाचा उत्सव साजरा करण्यासाठी 'एमएसएमई अच्छा है' हे खास गाणे समर्पित करण्यात आलेले आहे. देशाच्या जीडीपीमध्ये एमएसएमई क्षेत्राचे अंदाजे 30 टक्के योगदान आहे.

'एमएसएमई अच्छा है' ही मोहीम एमएसएमई क्षेत्रातील कंपन्यांच्या योगदानाला सलाम करते आणि त्यांच्या रोखता-




आधारित कार्यप्रणालीतून औपचारिक अर्थव्यवस्थेकडे संक्रमण करण्यास प्रोत्साहन देत आहे. त्यामुळे त्यांचा कर्ज मिळण्याच्या प्रक्रियेतील आणि यंत्रणेतील प्रवेश आणखी सक्षम होऊन व्यवसाय वाढीला चालनाही मिळते. प्रगत एआय तंत्रज्ञानाचा वापर करून युग्रोच्या मार्केटिंग टीमने स्वत: तयार केलेले हे गीत, यु ग्रो च्या एमएसएमईप्रती असलेल्या "एमएसएमई अच्छा है" या दीर्घकालीन विश्वासाला मूर्त रूप देते. जागतिक एमएसएमई दिनानिमित्त यू ग्रो कॅपिटलच्या यूट्यूब चॅनेलवर या गीताचा प्रीमियर होईल आणि लिंक्डइन, फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सअॅप आणि ट्विटरवर यासारख्या सोशल मिडीयातून त्याचा मोठ्या प्रमाणावर प्रचारसुध्दा केला जाणार आहे. या सर्वसमावेशक डिजिटल रणनीतीतून युग्रोने देशभरातील एक दशलक्ष एमएसएमई आणि भागधारकांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. यु ग्रो कॅपिटल संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक श्री शचिंद्र नाथ म्हणाले, "यु ग्रो ने अगदी प्रारंभापासून आपले मन, शरीर आणि आत्मा एमएसएमई क्षेत्रावर केंद्रित केलेला आहे आणि त्यामुळे साहजिकच जागतिक एमएसएमई दिवस आमच्यासाठी खूप महत्वाचा आहे. 'एमएसएमई अच्छा है' या मोहिमेद्वारे, आम्हाला त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाला प्रकाशझोतात आणायचे आहे आणि एमएसएमईंना औपचारिक अर्थव्यवस्थेत पाऊल ठेवण्यासाठी प्रोत्साहित करायचे आहे. एमएसएमईंना सक्षम बनवण्यावर यु ग्रो कॅपिटल विश्वास ठेवते. या गीताव्दारे भारतातील एमएसएमईचा आवाज आणखी बुलंद करूया आणि जोमदार वाढ व यशाच्या दिशेने त्यांच्या वाटचालीला आपण पाठिंबा देऊया." एमएसएमई क्षेत्र 90 टक्क्यांपेक्षा जास्त व्यवसाय करतात आणि देशातील तब्बल 120 दशलक्ष लोकांना रोजगार देतात.

## विद्यार्थ्यांसाठी भारतातील आघाडीच्या शैक्षणिक केंद्रातर्फे पूर्वतयारी सत्रांचे आयोजन

- **विद्यार्थ्यांचा आयर्लंडमधील शैक्षणिक प्रवास सुरळीत व्हावा, याकरीता त्यांना सर्वंकष माहिती, संसाधने व साह्य प्रदान करण्यात 'वनस्टेप ग्लोबल'चा पुढाकार**




**भारत (दै. आरंभ पर्व)**

नॅशनल कॉलेज ऑफ आयर्लंड (एनसीआय), डब्लिन सिटी युनिव्हर्सिटी (डीसीयू), टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी शॅनन (टीयूएस), मेनूथ युनिव्हर्सिटी अशा प्रतिष्ठित आयरिश संस्थांमध्ये शिकायला जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांसाठी वनस्टेप ग्लोबल या संस्थेतर्फे पूर्वतयारीची सत्रे आयोजित करण्यात येत आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये आयर्लंड हे भारतीय विद्यार्थ्यांमध्ये उच्च शिक्षणाचे लोकप्रिय ठिकाण म्हणून उदयास आले आहे. 2021-22मध्ये तेथे जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत 20 टक्के वाढ झाली आहे. आयर्लंडची स्वागतपूर्ण संस्कृती, तेथील मजबूत अर्थव्यवस्था, परवडणारी शिक्षण प्रणाली आणि अभ्यासोत्तर कामाच्या संधी यांमुळे ही संख्या वाढत चालली आहे. विद्यार्थ्यांचे आयर्लंडला जाणे व तिथे राहणे सुरळीत व्हावे याकरीता त्यांना सर्वंकष व सर्वसमावेशक साह्य आवश्यक असते आणि या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यामध्ये आयरिश विद्यापीठांकडूनही पुढाकार घेतला जातो.

पूर्वतयारीच्या या सत्रांमध्ये विद्यार्थ्यांना आयर्लंडमधील अभ्यासक्रम, तेथील अधिवास या गोष्टी सहजरित्या कशा उपलब्ध होतील, याविषयीचे मार्गदर्शन या पूर्वतयारीच्या सत्रांमध्ये केले जाते. आयर्लंडमधील सांस्कृतिक समायोजन, व्हिसाची व्यावहारिक माहिती, पॅकिंगबद्दलच्या टिप्स, बजेटिंग, घरांची शोधाशोध आणि आरोग्यसेवांची उपलब्धता याबद्दल या सत्रांमध्ये माहिती देण्यात येते. याव्यतिरिक्त, आयर्लंडमधील विद्यार्थी सहाय्यक सेवा आणि सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रम यांचीही माहिती विद्यार्थ्यांना या सत्रांत मिळेल. इतर विद्यार्थ्यांशी संपर्क साधणे, आयर्लंडला जाण्याअगोदरची तयारी व तेथे उतरल्यानंतरची प्रक्रिया यांची सविस्तर माहिती मिळवणे, तिथल्या कॅम्पसवरच्या जीवनाबद्दल जाणून घेणे आणि आयरिश संस्कृतीशी अवगत होणे अशा संधीदेखील या पूर्वतयारी सत्रांमध्ये मिळतात. येत्या दि. 29 जून रोजी चेन्नईमध्ये, 30 जून रोजी बंगळुरूमध्ये, 3 जुलै रोजी दिल्लीत, 6 जुलै रोजी पुण्यात आणि 7 जुलै रोजी मुंबईत ही सत्रे होणार आहेत.

विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांचे आणि अडथळ्यांचे निराकरण होऊन आयर्लंडमध्ये त्यांना सकारात्मक आणि समृद्ध अनुभव मिळावेत, यासाठी विविध आयरिश विद्यापीठांचे प्रतिनिधीही याप्रसंगी मार्गदर्शन करतील. 'टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी शॅनन ग्लोबल'च्या 'इंटरनॅशनल स्टुडंट एक्सपिरिअन्स ऑफिस'मधील ग्रेग व्हॅन बुस्कर्क यांनी सांगितले, "एखाद्या वेगळ्या देशात आणि संस्कृतीत जाऊन तेथे शिक्षण घेण्यासाऱ्खा महत्त्वाचा टप्पा गाठताना विद्यार्थ्यांना कोणत्या अडचणींचा व समस्यांचा सामना करावा लागतो, हे आम्ही जाणतो. अनेक विद्यार्थ्यांना आमच्या देशात शैक्षणिक प्रवास सुरु करताना मी शिक्षण सल्लागार या नात्याने पाहिले आहे आणि त्यामुळे मी आत्मविश्वासाने सांगू शकतो की आयर्लंडमध्ये अभ्यास करणे हे एक विलक्षण साहस आहे. तुम्हाला विद्यार्थी, व्यावसायिक आणि एक व्यक्ती म्हणून विकसित होण्यास ते मदत करते.

'वनस्टेप ग्लोबल'चे संस्थापक आणि संचालक अरित्रा घोषाल म्हणाले, "हुशार विद्यार्थ्यांच्या या शैक्षणिक प्रवासाचा भाग बनण्यामुळे मी रोमांचित झालो आहे. विद्यार्थ्यांना या सत्रांमधून आयर्लंडमधील आवश्यक माहिती आणि मार्गदर्शन मिळणार आहे. तिथल्या वातावरणात सुरळीतपणे सामावून कसे जायचे याची माहिती मिळण्याची ही उत्तम संधी आहे. 'वनस्टेप ग्लोबल'चा आमचा चमू ही सत्रे व्यावसायिकपणे हाताळेल आणि आयरिश विद्यापीठांचे सल्लागारही त्यात सहभागी होतील. सर्व प्रकारची मदत आणि मार्गदर्शन करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. विद्यार्थ्यांना नवीन वातावरणात रुळण्यास यामुळे मदत होईल."

## ज्ञानाला कृतीची जोड देणारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : डॉ. प्रकाश चौधरी

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

कौशल्याभिमुख शिक्षणाला प्राधान्य देणारी शिक्षणव्यवस्था असलेले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण खऱ्या अर्थाने ज्ञानाला कृतीची जोड देणारे असल्याचे प्रतिपादन नेस वाडीया महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रकाश चौधरी यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्कूल कनेक्ट संपर्क अभियानांतर्गत एकदिवसीय जनजागृती कार्यशाळेत बोलत होते.

या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, वाडिया महाविद्यालयातील गणित विभागप्रमुख डॉ. रामदास सोनवणे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एसबीएमचे प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, समन्वयक डॉ. दिलीप




मुळूक आणि पदवीच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेले विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

डॉ. प्रकाश चौधरी म्हणाले की, शाश्वत व सर्वसमावेशक विकासाचा अंतर्भाव समाजात होण्यासाठी या शैक्षणिक धोरणाची रचना केली आहे. यातून राष्ट्रीय विकासाला चालना मिळणार आहे. तसेच यामध्ये मातृभाषेतून शिक्षणासह भारतीय परंपरा आणि मूल्ये यावर भर देण्यात आल्याचे सांगितले.

डॉ. रामदास सोनवणे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात प्रात्यक्षिक शिक्षणाला महत्त्व असल्याचे सांगून व्यवसाय व नोकरीसाठी विद्यार्थ्यांना हे शैक्षणिक धोरण उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले.

यावेळी कार्यक्रमास हजर असलेल्या विद्यार्थी व पालकांना उपस्थिती प्रमाणपत्रे देण्यात आले.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक, परिचय डॉ. गणेश धुमाळ यांनी तर आभार डॉ. दिलीप मुळूक यांनी मानले.

## ग्रामपंचायत कनेरसर, ता. खेड, जि. पुणे

मौजे कनेरसर, मु.पो.कनेरसर, ता.खेड, जि.पुणे यांचे तर्फे पुणे जिल्हा परिषद पुणे यांचेकडील नोंदणीकृत ठेकेदार त्यांचेकडून दोन पाकीटे सीलबंद लिफाफा पध्दतीने खालील विकासकामांची निविदा बी-१ मागविण्यात येत आहे.

कोऱ्या निविदेचा नमुना ग्रा.पं. कार्यालय कनेरसर येथे उपलब्ध असून सदर निविदा दि. ०१/०७/२०२४ ते ०५/०७/२०२४ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते ०३ या वेळेत उपलब्ध करुन देण्यात येतील. व ठेकेदार यांचेकडून पाठविण्यात आलेल्या सीलबंद निविदा सदर कालावधीत स्वीकारण्यात येतील. प्राप्त निविदा दि. ०८/०७/२०२४ रोजी दुपारी ०२ : ०० वाजता ग्रा.पं. कार्यालय कनेरसर येथे उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा किंमत | कामाचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे कनेरसर जि.प. शाळा उर्वरित स्टेज बांधकाम करणे. | ६७,५६६/- | १% | २००/- | ३ महिने | सु.बे. |
| २ | मौजे कनेरसर जि.प. शाळा झोडकवाडी येथे पाणीपुरवठा करणे. | ३,४८,३३५/- | १% | २००/- | ३ महिने | सु.बे. |
| ३ | मौजे कनेरसर येथील विविध वाड्या वस्त्या मुरमीकरण करणे. | ३,००,०००/- | १% | २००/- | ३ महिने | सु.बे. |
| ४ | मौजे कनेरसर येथील वाकीवस्ती गोकुळशेत येथे पाईपलाईन करणे. | ९३,९८७/- | १% | २००/- | ३ महिने | सु.बे. |

**नियम व अटी :** १) जि.प.पुणे अथवा तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणीकृत ठेकेदार प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहील. २) तीन वर्षाचे आय.टी.आर रिटर्न व जीएसटी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. ३) सदर निविदा बी-१ फॉर्म परिपूर्ण भरणे बंधनकारक राहील. ४) इसार/निविदा फी धनाकर्ष/ डीडी स्वरूपात ग्रा.पं. लेखासंहिता २०११ नुसार नावाने जमा करणे बंधनकारक राहील. ५) सदर काम व त्याचा ठेका रद्द करण्याचा संपूर्ण अधिकार सरपंच ग्रामपंचायत कनेरसर यांना राहील.

सही/-
ग्रामसेवक
ग्रामपंचायत कनेरसर,
ता. खेड, जि. पुणे

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत कनेरसर,
ता. खेड, जि. पुणे

# बारामतीतला विजय हा सामान्य जनतेचा विजय आहे : सुप्रिया सुळे

## खडकवासला विधानसभा मतदारसंघात कार्यकर्त्यांचा कृतज्ञता मेळावा उत्साहात संपन्न




**पुणे-लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

आपण दिलेल्या भरभरून मतांनी संसदेत जाण्याचा मान मिळतोय,भविष्यामध्ये अशाच प्रकारे दडपशाहीच्या विरोधामध्ये आवाज उठवून जनतेचे राज्य आणूया असे प्रतिपादन खा.सुप्रियाताई सुळे यांनी केले. माझा हा विजय हा तुमच्या सगळ्यांमुळे शक्य झालाय असे कार्यकर्त्यांना संबोधित करत इंडिया आघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांचे आभार सुप्रिया सुळेंनी मानले.

खडकवासला मतदारसंघातील नवले लॉन्स, नऱ्हे, पुणे येथे इंडिया आघाडीच्या वतीने आयोजित 'कृतज्ञता मेळावा विजयाच्या शिलेदारांचा' या कार्यक्रमाला सुप्रिया सुळे उपस्थित होत्या.

पुढे बोलताना त्यांनी बारामती लोकसभा मतदारसंघातील विजयासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केलेल्या इंडिया आघाडीतील घटकपक्षांचे आभार मानले व आगामी काळात दडपशाहीला झुगारून मायबाप जनतेला अभिप्रेत असणारे रयतेचे राज्य आणण्यासाठी काम करू, असा संकल्प करूयात असे सांगितले.

प्रास्ताविक करताना राष्ट्रवादी काँग्रेस( एसपी) खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष काकासाहेब चव्हाण यांनी कार्यक्रमाबद्दलची पार्श्वभूमी सांगितली व आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये असेच एकदिलाने काम करून विजय मिळवण्याचा निर्धार व्यक्त केला.


यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, माजी आमदार कुमार गोसावी खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष सोपान काका चव्हाण, माजी नगरसेवक विशाल तांबे, सचिन दोडके, बाळाभाऊ धनकवडे, खडकवासला ग्रामीणचे अध्यक्ष त्रिंबक अण्णा मोकाशी, कोथरूड विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष स्वप्निल दुधाणे, खडकवासला कार्याध्यक्ष सुरेश अण्णा गुजर, आम आदमी पक्षाचे शहराध्यक्ष धनंजय बेनकर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधानसभा प्रमुख नितिन वाघ, हवेली तालुका प्रमुख तानाजी पवळे, काँग्रेसचे खडकवासला अध्यक्ष सचिन बराटे, राहुल मते, श्रीरंग चव्हाण, वंचित बहुजन आघाडीचे खडकवासला अध्यक्ष राजेंद्र सोनवणे, संतोष चाकणकर, राजेश्वरी पाटील, शरद दबडे, सुधाकर गायकवाड, पुनम मते, हनुमंत शिवूर, साहिल कांबळे, सौरभ कोंडे यांच्यासह इंडिया आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

### खडकवासला विधानसभा मतदारसंघात परिवर्तन होणार

सर्वचं वक्त्यांकडून महाविकास आघाडी एकत्र राहून भविष्यात खडकवासला विधानसभाही जिंकू, ताई महाविकास आघाडीचा उमेदवार द्या आम्ही सर्वजण निवडून आणूण यावेळी खडकवासला विधानसभा मतदारसंघात परिवर्तन अटळ आहे. असा विश्वास महाविकास आघाडीच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## थोडक्यात

### अमरचंद खारीवाल यांचे निधन



**राजगुरूनगर (आरंभ पर्व) :** खाद्यपदार्थांचे येथील प्रसिद्ध व्यापारी अमरचंद दलीचंद खारीवाल यांचे हृदयविकाराने निधन झाले. ते 79 वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, चार मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते येथील राजगुरूनगर सहकारी बँकेचे माजी उपाध्यक्ष, खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे माजी संचालक तसेच जैन श्रावक संघाचे माजी संचालक होते. त्यांच्या अंत्ययात्रेस मोठा जनसमुदाय उपस्थित होता.




### समाजात संवेदनशीलता, दातृत्वाची इच्छा निर्माण व्हावी

**पुणे (आरंभ पर्व) :** "दीपस्तंभ फाऊंडेशनने मनोबलच्या माध्यमातून दिव्यांग व अनाथ विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी केलेले कार्य आदर्शवत आहे. दिव्यांग, वंचित घटकांसाठी विविध ठिकाणी अनेक लोक काम करत आहेत. 'दीपस्तंभ'चे कार्य सरकारी यंत्रणेलाही प्रेरक आहे. दिव्यांगांसाठी सरकारकडूनही अनेक उपक्रम हाती घेण्यात आले असून, लवकरच राज्यात खास दिव्यांगांसाठीच्या विद्यापीठाची स्थापना करण्यात येणार आहे," असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. समाजात संवेदनशीलता, दातृत्वाची इच्छा निर्माण व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. दीपस्तंभ फाउंडेशन, मनोबल पुणे परिवारातील दिव्यांग, अनाथ आणि वंचित विद्यार्थ्यांचा विविध स्पर्धा परीक्षा व राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षांत मिळवलेल्या यशाबद्दल आयोजित सत्कार सोहळ्यात पाटील बोलत होते. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड येथे आयोजित सोहळ्यात विशेष अतिथी म्हणून केंद्रीय अपंग सक्षमीकरण विभागाचे सचिव राजेश अग्रवाल, पंजाब येथील अंधत्वावर मात करून आयएएस झालेले अजय अरोरा, पुण्याचे जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन, बजाज फिनसर्व्हच्या सीएसआर समितीच्या प्रमुख शेफाली बजाज, दीपस्तंभ फाऊंडेशनचे मुख्य सल्लागार मधुकर कोतवाल, संस्थापक यजुर्वेंद्र महाजन, ग्लोबल सदस्य अमित वाईकर उपस्थित होते.

### वारकऱ्यांचा सन्मान

**पुणे (आरंभ पर्व) :** हाती भगवी पताका, डोक्यावर तुळशी वृंदावन अन हातात टाळ - मृदुंग घेत वैष्णवांचा मेळावा आज पुण्य नगरीत दाखल झाला. या पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर आज विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणेच्या वतीने वारकरी संप्रदाय, सामाजिक, कला, संत सेवेकरी, भजन - कीर्तन गायन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या वारकऱ्यांना 'जगद्गुरू संत शिरोमणी तुकाराम महाराज जीवनगौरव पुरस्कार 2024' देवून सन्मानित करण्यात आले. यामध्ये प्रख्यात पखवाज वादक ह. भ. प. प्रकाश निंबाळकर, कीर्तनकार ह. भ. प. रतनबाई निंबाळकर, भजन - कीर्तन गायक ह. भ. प. संजय बहिरट, भजन गायक ह. भ. प. कमलाकर महाबळे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे अध्यक्ष पुरुषोत्तम मोरे यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. पालखी विसावा बोपोडी, मेट्रो स्टेशन जवळ आज (रविवार, दि. 30) पार पडलेल्या या पुरस्कार सोहळ्यास माजी उपमहापौर सुनीता वाडेकर व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे महाराष्ट्र संघटक परशुराम वाडेकर यांची उपस्थिती होती.

# सनदी लेखापालांकडून विकसित भारत दौड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) 75 व्या वर्धापनदिनानिमित्त सनदी लेखापालांकडून विकसित भारत दौडचे आयोजन करण्यात आले. 'आयसीएआय' पुणे शाखा आणि विद्यार्थ्यांच्या 'विकासा' शाखेच्या वतीने आयोजित दौडला सारसबाग येथून सुरवात झाली. 200 पेक्षा अधिक सीए सभासद, विद्यार्थी व त्यांचे कुटुंबीय यामध्ये सहभागी झाले होते. सीए जुगल राठी यांनी हिरवा झेंडा दाखवल्यानंतर सारसबाग येथून सुरू झालेली ही दौड मित्रमंडळ चौक, लक्ष्मीनारायण चौक, सिटीप्राईड, निमंत्रण हॉटेल, बिबवेवाडी सिग्नल, महावीर इलेक्ट्रॉनिक्स या मार्गाने आयसीएआय भवन येथे पोहोचली.



'आयसीएआय'च्या केंद्रीय समितीचे सदस्य सीए चंद्रशेखर चितळे, पुणे शाखेच्या अध्यक्षा सीए अमृता कुलकर्णी, उपाध्यक्ष सीए सचिन मिणियार, 'विकासा' चेअरमन सीए प्रणव आपटे, सीए प्रितेश मुनोत, सीए अजिंक्य रणदिवे आदी उपस्थित होते. सीए चंद्रशेखर चितळे म्हणाले, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या स्वातंत्र्याचा शताब्दी महोत्सव 2047 मध्ये होत असताना भारत विकसित देश व्हावा, हे ध्येय ठेवले आहे. आर्थिक प्रगती, सामाजिक सुधारणा, शाश्वत पर्यावरण, चांगले प्रशासन, सर्वांगीण विकास यातून हे ध्येय साकारले जाणार आहे.

# सुशांत कुटे युथ फाउंडेशनचा विद्यार्थी गौरव सोहळा उत्साहात संपन्न

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला वाव देण्यासाठी त्यांचा सन्मान होणं ही मोठी गोष्ट असल्याचे मतं खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर यांनी व्यक्त केले.

नऱ्हे येथे माजीउपसरपंच सुशांत कुटे युथ फाउंडेशन च्या वतीने 10वी-12वी गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.त्यावेळी ते उपस्थित होते. यावेळी शिक्षण क्षेत्रात मोठे योगदान असणारे प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर सर यांनी विध्यार्थी व पालकांना भविष्यातील शिक्षणाच्या विविध संधी बाबत मोलाचे मार्गदर्शन केले.



ह्यां गौरव सोहळ्यात दहावी व बारावी पास झालेल्या 211 गुणवंत विद्यार्थ्यांचा नऱ्हे ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

भाजपा पुणे शहर सरचिटणीस महिला आघाडीच्या कोमल सुशांत कुटे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी अरुणजी राजवाडे, मा.उपसरपंच अक्षय इंगळे, मा.उपसरपंच सतीश कुटे, मा.उपसरपंच धनश्री भूमकर, ग्रा.पं.सदस्य किरण गोगावले ,संदीप कुटे, अॅड. अमोल तनपुरे,सचिन खेडेकर, विक्रम कुटे, निलेश मेमाणे, विलास पवार, कुलकर्णी काका, कल्याण अवताडे,येवले सर, हजारे सर, विजय मुठेकर, विनोद विर,मनीषा बाराटे,प्रियंका पाटील,सविता पवार, रामेश्वरी दांगट, रेणुका दूधभाते, आदी मान्यवर उपस्थीत होते.

# राहुल भड समाजरत्न पुरस्काराने सन्मानित

**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**

गौडगाव ता.बार्शी येथील सहारा वृद्धाश्रमचे अध्यक्ष राहुल भड यांना यशवंती आधार सामाजिक संस्थेच्या वतीने समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शिक्षण तज्ञ हेमंत भगत, व्याख्याते गजानन उफाडे, शंकर राजगुडे, संस्था अध्यक्ष राजेश दिवटे, काव्य मित्र संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र सगर, गजल गायक बाळासाहेब गिरी आदी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये पिंपरी पुणे येथे पुरस्कार देण्यात आला.




कार्यक्रमात भड यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले.

यापूर्वी त्यांना परिवर्तन राज्यस्तरीय पुरस्कार नळदुर्ग, गुणिजन रत्नगौरव पुरस्कार मुंबई, राष्ट्रीय कार्य गौरव पुरस्कार पुणे, प्रतिभा संग्राम पंढरी गौरव पुरस्कार पंढरपुर, ग्राहक समितीच्या वतीने आदर्श पुरस्कार मोहोळ, स्व. जयवंत (दादा) कटमोरे प्रतिष्ठान यांच्या वतीने सामाजिक कार्याबद्दल पुरस्कार पिंपरी सा., जिविका फाऊंडेशन पुणे यांच्या वतीने कोविड योद्धा पुरस्कार, वृध्द सेवा गौरव पुरस्कार कळंब, समाजरत्न पुरस्कार रत्नागिरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता पुरस्कार आळजापूर, बार्शी नगरपरिषद व लायन्स क्लब बार्शी रॉयल यांच्यावतीने पुरस्कार, आर्य समाज पिंपरी पुणे यांच्या वतीने पुरस्कार, कालभैरव नागरी सह. पतसंस्था बार्शी यांच्या वतीने पुरस्कार अशा विविध पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला आहे.

त्यांना या मिळालेल्या पुरस्कारामुळे त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, तालुक्यातील अनेक मान्यवरांनी त्यांचे प्रत्यक्ष, भ्रमणध्वनीद्वारे अभिनंदन करून कौतुक केले आहे.

# निबावकडून एआय-सक्षम सीरीज 4 होम लिफ्ट्स सादर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील सर्वात मोठा घरगुती ब्रँड असलेल्या निबाव लिफ्ट्सने तंत्रज्ञानातील आपल्या सामर्थ्याच्या बळावर सर्वात प्रगत अशा निबाव सीरीज 4 होम लिफ्ट्स पुण्यात सादर केल्या आहेत. या नवीन सादर केलेल्या लिफ्टमध्ये एआय-सक्षम केबिन डिस्प्ले, काटेकोर संचालनासाठी इन्ट्यूटिव्ह एलओपी डिस्प्ले लिडार 2.0 तंत्रज्ञान आणि हळूवार लँडिंग अशी अत्याधुनिक तंत्रज्ञानाची वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे घरगुती इलेव्हेटर्सच्या क्षेत्रात ती अशा प्रकारचे पहिलेच उत्पादन ठरणार आहे.



मिडनाईट ब्लॅक या एकमेव आवृत्तीत सादर झालेल्या निबाव सीरीज 4 लिफ्ट्समध्ये हवेवर चालणाऱ्या कोणत्याही लिफ्टमध्ये सर्वात मोठी केबिनची जागा आहे.

# दोन्ही अंडरपास जवळील वाहतूककोंडीचा प्रश्न सुटणार

- आमदार सिद्धार्थ शिरोळे
- खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड, रेल्वे प्रशासन, पुणे मनपा अधिकाऱ्यांच्या बैठकीत महत्वपूर्ण निर्णय



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकी रेंज हिल्स येथील दोन्ही अंडरपास जवळील वाहतूक कोंडीचा प्रश्न आता लवकरच सुटणार असून त्याबाबत त्वरित ठोस पावले उचलण्यात येणार आहेत. खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड, रेल्वे प्रशासन व पुणे मनपा अधिकाऱ्यांची बैठक नुकतीच पार पडली असून त्यामध्ये पुढील कार्यवाही बाबत चर्चा होऊन महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत, अशी माहिती आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी दिली.

विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयात झालेल्या बैठकीला आमदार सिद्धार्थ शिरोळे यांसह खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचे सीईओ, रेल्वेचे डीआरएम, पुणे मनपा मुख्य अभियंता श्रीनिवास बोनाला तसेच डिफेन्स इस्टेट ऑफिसर आणि अम्युनिशन फॅक्टरी खडकी चे अधिकारी आदी उपस्थित होते.

सिद्धार्थ शिरोळे म्हणाले, या भागातील वाहतूक कोंडी सोडविण्याकरिता रस्त्याची रुंदी वाढविण्यात येणार आहे. येथील अंडरपासची रुंदी 6 मीटर असून ती भविष्यात 18 मीटरपर्यंत वाढविण्यात येईल. प्रथमतः यावर उभारण्यात येणाऱ्या पुलाकरिता जनरल अरेंजमेंट ड्रॉईंग (जीएडी) तयार करण्यात येणार आहे. हे ड्रॉईंग रेल्वे प्रशासनाकडून कडून तयार करण्यात येणार आहे आणि या कामाकरिता लागणारा निधी पुणे मनपाकडून वितरीत करण्यात येणार आहे.

याबाबत लागणाऱ्या परवानग्या खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड आणि रेल्वे बोर्ड येत्या तीन ते चार महिन्यांमध्ये घेणार आहे. पुलाचे काम चार महिन्यानंतर सुरू होणार असून रेल्वे ओव्हरब्रिज चे काम रेल्वे प्रशासनाकडून करण्यात येईल. तसेच तेथील रस्ते किंवा इतर पायाभूत सुविधा या पुणे मनपातर्फे करण्यात येणार आहेत. याशिवाय अम्युनेशन फॅक्टरी खडकी च्या अंतर्गत असलेल्या जागेसंबंधी परवानग्या मिळाल्यानंतर जून 2025 पर्यंत पुलाचे काम पूर्ण करण्यात येणार असल्याचे शिरोळे यांनी सांगितले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.